International Journal of Researches in Social Science and Information Studies (IJRSSIS)
September 2014 Issue-III, Volume-II
Online Journal ISSN No. 2347-8268

# गोविंदाग्रजांच्या प्रेमकवितेतील – नैराश्यभाव

**कलावती भि. मोहोड**
हुतात्मा राष्ट्रीय कला व विज्ञान महाविदयालय, आष्टी, जि. वर्धा.

**राम गणेश गडकरी उर्फ 'गोविंदाग्रज'**
**जन्म 26 मे 1885 – मृत्यू 23 जानेवारी 1919**
**जन्म – गुजरात मध्ये नवसारी तालुक्यात गणदेवी येथे**
**मृत्यू – सावनेर येथे (विदर्भामध्ये) क्षय रोगाने,**
**गोविंदाग्रज हे टोपणनांव त्यांनी काव्य लेखनासाठी स्विकारले**
**काव्य संग्रह – वाग्वैजयंती (1921)**

आधुनिक मराठी कवितेमध्ये प्रेमकवितेला ज्यांनी नावलौकिक प्राप्त करुन दिला. एवढेच नव्हे तर महाराष्ट्रमध्ये 'प्रेमाचे शाहीर' म्हणून ज्यांची ओळख आहे असे गोविंदाग्रज. आधुनिक मराठी कवितेचे जनक कवी केशवसुत यांना त्यांनी कविता लेखनामध्ये आपला गुरु मानले.

''केशवपुत्राचा महशूर गोविंदाग्रजचेला सच्चा'' अशा शब्दात गोविंदाग्रजांनी आपली परंपरा आणि शिष्यत्व स्पष्ट केले आहे. परंतू केशवसुतांची कविता ही बंडखोर, क्रांतीची तुतारी फुंकणारी होती. तर गोविंदाग्रजांची कविता ही समन्वयाची आहे. गोविंदाग्रजांच्या कवितेमध्ये विचारांपेक्षा विकारांचेच प्राबल्य जास्त दिसते. म्हणुनच ते केशवसुतांप्रमाणे जग उलथून टाकण्याची भाषा बोलू शकले नाही. त्यांनी केशवसुतांच्या तुतारी, हरपलेले श्रेय, धुबड या कवितांचे अनुकरण अनुक्रमे दसरा, फुटकी तपेली, आणि घुबडास असे केले. आणि केशवसुतांप्रमाणे समाजाभिमुख होण्याचा प्रयत्न केला.

गोविंदाग्रजांच्या प्रतिभेने विविध विषयांना स्पर्श केला असला तरी ती प्रतिभाच पोळून तिला विदग्ध करण्याचे श्रेय प्रेमाला दिले पाहिजे. गोविंदाग्रजांची प्रेमकविता एका आर्त जीवाचा असहाय हुंदका आहे. प्रेमकल्पनेपासून चिर निराशेच्या काळोख्या क्षणापर्यंत प्रेमातील नानाविध भावनातरंगांचे वर्णन गोविंदाग्रजांनी केले ते मराठी काव्यात अपूर्व आहे.

**निष्प्रेम चिरंजीवन ते जगि दगडाला ही मिळते।।अधिक् तया।।**
**क्षण एक पुरे प्रेमाचा, वर्षाव पडो मरणांचा ।।मग पुढे।।**

असे 'प्रेम आणि मरण' या कवितेमध्ये सांगीतलेले काव्यचरण त्यांच्या सर्वच प्रेमकाव्याची मध्यवर्ती कल्पना आहे असे म्हटले तरी अतिशयोक्ती होणार नाही.

''गोविंदाग्रजांच्या कवितेत प्रामुख्याने उत्तुंग कल्पनाशक्ती – इमॅजिनेशन–तरल कल्पना – फॅन्सी यांचे विपुलतेने दर्शन होते. अतिशय तीव्र बुद्धिमत्ता, भावनाप्रधान पण निराश झालेले मन,


A Four-monthly Journal By
Vishwashanti Multipurpose Society,
(Global Peace Multipurpose Society)

*भाषाप्रभुत्व आणि सनातन अशा अमूर्त वस्तूची आंतरिक ओढ यांनी गोविंदाग्रजांचे कवि हृदय परिपूर्ण होते.[1] असे प्र. न. जोशी म्हणतात.*

*गोविंदाग्रजांच्या काही कवितांमध्ये शब्दचमत्कृती व कल्पनाविलास यांचे मनोहर नृत्य दिसते. त्यांचे कल्पनाविलासात रमतांना दिसते, त्यांची प्रणयगीते तर करुणेने आणि निराशेने भारावलेली आहेत. त्यांचे एकाकी आयुष्य, अत्यंत भावनाप्रधान वृत्ती, वैयक्तिक जीवनात आलेले अपयश, जगाचा उबग व उद्वेग इत्यादींचे एक चमत्कारिक मिश्रण त्यांच्या कवितांतून रोगट वाटावे इतके झाले आहे.*

*हाती संसाराची माती निष्प्रेमाची शेज सोबती'' असा त्यांचा अनुभव असावा, त्यांच्या अनेक प्रेमकवितांमध्ये नैराश्य दिसून येते. 'जुन्या कवितांची आठवण', 'अवेळी ओरडणाऱ्या कोकिलेस', 'फणसाचे पान', 'निर्दय बालेस', 'कधी', 'हृदयशारदेस', 'पुनर्जात प्रेमास', 'शेवटचे प्रेमगीत', 'हा क्षण' इत्यादी कवितांतून कवीच्या मनातील प्रेमाच्या विफलतेचे दुःख ठिबकताना दिसते. पहिल्या कवितेत 'अल्लड प्रेमास यात ते म्हणतात*

***''क्षणभर वेडया प्रेमा । थांब जग सगळे हे देखाव्याचे ।***
***गुलाम केवळ हे स्वार्थांचे। स्मशान की हे शुद्धत्वाचे।***
***शुद्ध भाबडे, सरळ रोकडे, अशांत करिशील काय?***

*गोविंदाग्रजांची निराशा, विफलता, उदासवृत्ती, शब्दांचे लाघव, बुद्धीस थक करणारा कल्पनाविलास, तत्वचिंतनाचा स्पर्श इत्यादीमुळे सुसहय होते. नित्य नव्या कल्पना सुचाव्यात, भावमधुर शब्दांचा नाच ओठात उमटावा, पण रसिकतेची आपुलकीची, प्रेमाची जोड नसावी याचे दुःख ते अनेकदा व्यक्त करतात. गोविंदाग्रजांनी विरहावस्थेचे हे देणे आपले गुरु केशवसुतांकडून घेतलेले दिसते. केशवसुतांच्या बऱ्याचशा प्रेमकाव्यात विराहावस्थेतील मनःस्थिती व अनुभव व्यक्त होतांना दिसतात. त्याचेच अनुकरण गोविंदाग्रजांनी केले असे डॉ. स. रा. गाडगीळ म्हणतात त्यांच्यामते त्यांनी केवळ अनुकरणच केले नाही तर या बाबतीतील सर्व सामाजिक संकेत झुगारुन देऊन आपली संपूर्ण भावकहाणी अगदी क्रमशः आपल्या काव्यातून व्यक्त केली. गडकऱ्यांच्या काव्यलेखावरील नैराश्याची दाट छाया देखील केशवसुतांपासूनच आली आहे. 'घुबड', 'अरुण' या केशवसुतांच्या कवितेवर गोविंदाग्रजांनी 'घुबडास, 'दसरा' यासारख्या कविता लिहिल्या. प्रेम– वैफल्य हाच त्यांच्या बऱ्याचशा काव्यांचा स्थायीभाव आहे असे त्यांच्या कविता अभ्यासतांना जाणवते. प्रणयाचा दिव्य स्पर्श, प्रेयसीविषयी ओढ, निरभिलाष दिव्यप्रेमाविषयी आसक्ती, प्रत्यक्ष मीलनाची ओढ, स्फूर्ती, स्फूर्तीच्या अभावी अंतःकरणात उसळलेले काहूर, निष्प्रेम जीवनाची अंधकारमय वातावरणातून निर्माण झालेली आशा, शेवटचा नैराश्याचा धक्का आणि त्यातून निर्माण होणारी विफलता या विविध प्रेमभावना*

*गडकऱ्यांनी अत्यंत उत्कटपणे रंगविल्या आहेत. त्यातील विविधता, उत्कटता आणि जिव्हाळा यामुळे सारी प्रेमगीते अत्यंत हृदयंगम झाली आहेत. 'हृदयशारदेस' या कवितेत ते म्हणतात*

***''प्रीतिदेवता पायामधला कवि घुंगुरवाळा। प्रीतिदेवता जरा हालतां कवि करि गानाला। किंवा प्रेमरसावर हृदय तरंगत प्रेम पाठ बोले। मनातले हे गाणे माझे जनांतले झाले।***

*गोविंदाग्रजांच्या काव्याचा आत्मा प्रेमरस हा आहे या प्रेमामध्ये शारीरिक वासना आहे, दिव्य प्रणय आहे, आणि उदात्त भक्तिही आहे. प्रेमाची ही विविध स्वरुपे आहेत. 'ओसाड आडातील फुल, फुले वेचिली, कधी, प्रेमाखातर पुनर्जात प्रेमास, पहिले चुंबन, हृदय शारदेस या सारख्या कवितांतून मिलनाची ओढ वर्णिली आहे. 'मुरली' सारख्या काव्यातून प्रीती, भक्ती आणि मुक्ती यांचे वर्णन केले आहे. आणि 'प्रेम आणि मरण' या सारख्या काव्यातून अप्राप्य प्रणयाचे कल्पनीय चित्र रंगविले आहे. या विविध प्रेमगीतांमध्ये कवीची कल्पकता, प्रेमकल्पनेविषयीची आसक्ती आणि प्रणयाची आत्मप्रतीती या सर्वांचे दर्शन घडते.*

*गोविंदाग्रजांची प्रेमविषयक कल्पना ही स्त्रीपुरुष विषयक प्रणयापुरतीच मर्यादीत नाही ती विश्वात्मैक्य दृष्टी अशा व्यापक अर्थाने अभिप्रेत आहे. असे पुढील चरणातून जाणवते.*

***''जगत रंगले विश्व रंगले एक प्रेमरंगे। प्रेम नसे तर जीव नको हा प्रेमे जग चाले''।।***

*प्रेम हे साऱ्या विश्वाचा आधार आहे. गर्व, राग, द्वेष, त्वेष, आशा, निराशा या सर्वांचा लोप होऊन जिकडे तिकडे प्रेमरसाचा, हृदयरसाचा सागर नृत्य करीत आहे अशी कवीने कल्पना केली आहे. ही वृत्ती म्हणजेच प्रेमाचा प्रलयकाल होय असे त्यांनी. प्रेमाचा प्रलयकाल या कवितेत व्यक्त केले, ''मुरली' कवितेमध्ये त्यांनी प्रीती, भक्ती आणि मुक्ती या भावयोगाच्या तीन पायऱ्या आहे असे म्हटले त्यांच्यामते प्रणयाचे रुपांतर निरपेक्ष भक्तीत होऊन त्यातून दोन जीवांचे मीलन होते तोच मोक्ष होय. 'मी वेगळा आहे' या कल्पनेतून मुक्त होणे म्हणजे ज्यावर प्रेम करायचे त्या वस्तूनशी आत्यंतिक तादात्म्य होय. मानवी जीवनातील प्रणयाचा पाया जरी शारीरिक आकर्षक हा असला तरी त्याचाही शेवट आत्म्याच्या आत्यंतिक एकात्मतेत होण्यातच त्या प्रेमाचे अंतिम उदात्त स्वरुप व्यक्त होते. या उदात्त प्रणयाचे चित्रण मुरलीमध्ये गोविंदाग्रजांनी अत्यंत बहरीने केले[2] असे डॉ. स. रा. गाडगीळ म्हणतात गोविंदाग्रजांच्या प्रेम कवितांमध्ये प्रेम भक्तीपर काव्यापासून ते आत्यंतिक शृंगारापर्यंत विहार करणाऱ्या कविता आहेत. 'दिव्य प्रेमाची जाति, प्रेमपाठ सारख्या कवितेमध्ये निरपेक्ष, निरभिलाष प्रेम व्यक्त केले. प्रेमसाफल्य म्हणजे जिवितसाफल्य असे ते मानतात.*

***''प्रेम आणि मरण कवितेमध्ये पहिल्या दृष्टीपातातील प्रेम वर्णिले आहे.***

***परि कर्माचे विदान। काहीतरी असते आन।।चहुंकडे।।***



A Four-monthly Journal By
Vishwashanti Multipurpose Society,
(Global Peace Multipurpose Society)

**कोणत्या मुहूर्तावरी। मेघांत वीज लखलखती।। नाचली।।**

**त्याक्षणी। त्यचिया मनीं। तरंगती अणी। गोड तरि जहरी**

**प्रीतीच्या नवथर लहरी। न कळता**

*असा एक दिवशी अचानक योग आला अन् हा प्रीतीचा घाव त्यांच्या जिव्हारी बसला. त्याने जातिधर्म सुटला, जगाशी संबंध तुटला आणि आकाशातील त्या चंचलबालेच्या प्राप्तीची त्यांची तपश्चर्या सुरु झाली.*

*हा जो प्रेमयोग आहे तो एक प्रकारचा हटयोगच आहे असे कवी म्हणतो.*

**तो योग। खरा हटयोग। प्रीतिचा रोग लावला ज्याला। लागते जगावे त्याला। हे नसे ।।**

*या हटयोगाचे वर्णन कवीने बहारदार केले आहे. त्यांच्यामते हा इष्काचा जहरी पेला जो कोणी घेतो त्याचे जीवन हे असेच लोकविलक्षण असते.*

**'टोकाविन चालू मरणे। ते त्याचे होते जगणे।। सारखे।।**

**हृदयाला फसवूनि हंसणे। जीवाला न कळत जगणे। वरिवरि।।'**

*अशाप्रकारे अप्राप्य प्रेमविषयाच्या ध्यासाने वेडावून जाणे ही गडकऱ्यांच्या प्रेमसृष्टीतील सामान्य गोष्ट आहे निष्प्रेम जीवनाची दाहकता त्यांनी अतिशय उत्कटपणे रंगविली आहे. आकाशातील या चंचलबालेचे प्रेम अप्राप्य असल्याने या प्रेमिकांच्या नाशिबी निष्प्रेम जीवन कंठणे एवढेच उरते. ''अवेळी ओरडणाऱ्या कोकिळेस'', ''फुले वेचिती पण'', ''पुनर्विकसन'' इत्यादी कवितांमधून त्यांनी या निष्प्रेम जीवनाची असाहयता वर्णिली आहे.*

**''निष्प्रेमाची शेज सोबती। □भयाण दुनिया सारी भवती। विषण्ण येती विचारचित्ती।''**

*या चरणातील आर्तता हृदयेभदून जाणारी आहे. प्रेम आणि मरण या कवितेतही निष्प्रेम जीवनाचा धिक्कार आहे.*

**निष्प्रेम चिरंजीवन ते। जगि दगडालाही मिळते। धिक्तया।।**

**क्षण एक पुरे प्रेमचा। वर्षाव पडो मरणांचा। मग पुढे।।**

*ही निष्प्रेत जीवनांची असहयता 'फुले वेचिलीपण', या कवितेत प्रेयसीला देण्यासाठी 'फुलेवेचिली पण प्रेयसी कोठे आहे.*

**'हतभागी हा जीव एकता प्रीतीदेवता नाही। मोडुनि पडले हृदयमंदिर शतधा आघातांही।।**

**निष्प्रेमाचे जीवन माझे रुक्ष चिंतनी जावे। संकल्पाचि हा वराग ठरला, कां ते दैवा ठावे।।**



A Four-monthly Journal By
Vishwashanti Multipurpose Society,
(Global Peace Multipurpose Society)

असे नैराश्य, विफलता, असहयता त्यांच्या अनेक कवितांमध्ये दिसते. अनेक कवितांमधुन त्यांनी एकांताची, अंधाराची आवड व्यक्त केली आहे. प्रेम वैफल्यामुळे ही प्रवृत्ती बळावणे अगदी साहाजिक आहे. 'घुबडास' या कवितेत हे काळोखाचे आणि एकांताचे आकर्षण फारच उत्कटपणे वर्णिले आहे.

**तेजाची गंगाच आटली। काळोखाची प्रभा दाटली। भयानकाची सभा थाटली।**

**चिरंतनाचे प्रेताचि नाचेः लागे विश्व दुभगू।।**

प्रेमवैफल्याची या पुढची पायरी म्हणजे मृत्यूबद्दल ओढ वाटणे ही होय. 'शेवटचे प्रेमगीत, 'अंतकाळची याचना', 'माझा मृत्यूलेख', यासारख्या काव्यातून मरणाविषयीची तळमळ व्यक्त झालेली आहे. अप्राप्य प्रेमविषयाचा ध्यास घेतलेल्या प्रेमिकाच्या जीवनाचा शेवट हा असाच व्हावयाचा हेही त्यांनीच सांगून ठेवले आहे.

गोविंदाग्रजांची प्रणयगीते करुणेने व निराशेने भारावलेली आहेत. त्यांचे एकाकी आयुष्य, अत्यंत भावनाप्रधान वृत्ती वैयक्तिक जीवनात आलेले अपयश, जगाचा उबग वा उद्‌वेग इत्यादीचे एक चमत्कारिक मिश्रण त्यांच्या कवितांतून दिसते.

पन्हाळलगडावर कवी पुष्कळ फुले गोळा करतात. सुगंधी सौंदर्याचा ढीग त्याच्या ओंजळीत असतो. प्रणयरसाने त्याचे हृदय उचंबळूनही आले. पण आता ही फुले कोणास द्यावी? अशी राक्षसवृत्तीची स्मरणदेवता क्षणात जागी झाली. आपण हतभागी आहोत. एकले आहोत, आपणास प्रीतिदेवता नाही, असे आठवून त्या व्याकुळलेल्या मुखातून उद्‌गार बाहेर पडतात.

''काटयावरि या कोमल हृदया टाकुनि देवा क्रूर, कुठे फुलांची धनीन माझी दिली दवडुनी दूर
जीव जाहला जड, ती हाती पुष्पेहि जड झाली, फुले वेचिली पण पण आतां देतो टाकुनि खाली

चिरंमृताला हवा कशाला हा असला हव्यास, जिवंत फुलवंतीचा असला दुःखप्रद सहवास अशा या दुःखाच्या पोटीच त्यांना काही तात्विक कविता स्फुरल्या असाव्यात. भग्न हृदयाचा हा कवी म्हणजे दुःखाच्या प्रेम कवीता लिहीणारा श्रेष्ठ कवी असेच म्हणावे लागते. कारण त्यांचा खरा काव्यात्मा हा त्यांच्या करुणरस पूर्ण प्रेमगीतात आढळून येतो. आपल्या निराशेचे, वैफल्याचे चिरवेदनेचे जे चित्र त्यांनी कवितेत रंगविले आहे. तेवढेच रसिकांच्या मनात स्थिरावले मैना भटके वनात। वेड, राघू झुरतो मनात, विस्कळले पर, पिसे विखुरली, गळले दोन्ही पांख असे मनातील नैराश्य ते व्यक्त करतात. यावरुन असे दिसते की गोविंदाग्रजांच्या मनोरचनेचा उगम प्रणयवैफल्यात असावा. जलातील आपल्याच छायेवर ''प्रेमलुब्ध झालेले ओसाड आडांतील फूले अथवा'' पश्चिम दिशेला दिसणाऱ्या तारकेवर लुब्ध होणारा वेडा ही सारी गडकऱ्यांच्या अंतःप्रवृत्तीची प्रतीके आहेत. त्यांनी अप्राप्य अशा देवतेची मूर्ती त्यांनी हृदयपटलावर चितारली असावी आणि त्यातूनच त्यांच्या वैफल्यपूर्ण जीवनाचा



A Four-monthly Journal By
Vishwashanti Multipurpose Society,
(Global Peace Multipurpose Society)

प्रारंभ झाला असावा, याचेच प्रतिबिंब त्यांच्या काव्यात पडलेले दिसते. त्यांची नैराश्यपूर्ण प्रेमगीते नुसत्या कल्पनेतून उद्‌भवलेली नाहीत त्यामध्ये त्यांची भावकथा लिहिलेली आहे. प्रेमवैफल्याच्या दाहक अनुभावातून गोविंदाग्रजांचे मन होरपळून निघाले होते. त्याचेच कढ त्यांच्या काव्यातून उसळून येतात. डॉ. हर्षे, खांडेकर, प्रा. वाळिंबे यासारख्या गडकऱ्यांच्या सर्व टीकाकारांनी या भावकहाणीचे विस्तृत विवेचन केले आहे.

मी प्रेमाचा बंदा। माझा हाच असे धंदा। असे सांगून स्तुती निदेंची आपणाला पर्वा नाही अशी ते ग्वाही देतात, कारण जीव प्रेमात विरल्याने भेदाभेदच त्यांच्या ठिकाणी राहिले नव्हते.

**"जीवाच्या बागेत खेळतो पक्षी प्रेमाचा। पिसामागुनी पिसे काढणे मार्ग न सुज्ञाचा।**

असा सुज्ञपणा जागवण्याचाही प्रयत्न होतो. कवीचे हृदय, अंतःकरण आशानिराशेच्या स्वप्नवास्तवावर हिंदकळत राहते.

**कशास अशा नसती आता झाले ते गेले सुकले फुल न देत वास जरी अश्रूंनी भिजले।**

या सुकलेल्या फुलाच्या प्रतिमेत आपल्या भग्न हृदयाचे सगळे आकार त्यांना प्रतीत होतात हे फुल आता उमलणार नाही, याची खात्री पटविणारी निराशाच गोविंदाग्रजांच्या वाटचालीत साथीला आहे व म्हणून सगळी कविता म्हणजे या निर्माल्याची पूजा आहे. [3]

**ग्रंथसूची**

1) डॉ. अक्षयकुमार काळे – अर्वाचीन मराठी काव्यदर्शन – पां. ना. बनहट्टी प्रकाशन, नागपूर (वर्ष 1999)

2) डॉ. रा. रा. गाडगीळ – मराठी काव्याचे मानदंड – खंड पहिला – पद्मगंधा प्रकाशन पुणे (20 नोव्हेंबर 2005)

3) प्र. न. जोशी – मराठी वाङ्‌मयाचा विवेचक इतिहास – अर्वाचीन काळ श्री एल. व्ही. तावरे स्नेहवर्धन, सदाशिवपेठ पुणे (24 एप्रिल 2002)

4) डॉ. सुरेश भृगुदार – गोविंदाग्रजशैली – स्वरुप – समीक्षा – विजय प्रकाशन – हनुमान गल्ली , नागपूर (18 सप्टेंबर 2010)

5) रा. ग. जाधक – कविता आणि रसिकता – परिमल प्रकाशन औरंगाबाद (1 एप्रिल 2003)